RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ५, अंक ११२] बुधवार, ऑगस्ट १४, २०१९/श्रावण २३, शके १९४१ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक २७०**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**

**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**महसूल व वन विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १४ ऑगस्ट २०१९

**आदेश**

**महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम.**

क्रमांक मुद्रांक-२०१३/अनौ.सं.क्र. १९/प्र.क्र. २३५/म-१(धोरण).—ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने, शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र. पीएसआय-२०१३/ (प्र.क्र. ५४)/उद्योग-८, दिनांक १ एप्रिल २०१३ (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त शासन निर्णय " असा करण्यात आला आहे) याद्वारे सामुहिक प्रोत्साहन योजना-२०१३ (साप्रोयो-२०१३) (यात यापुढे जिचा निर्देश " उक्त साप्रोयो-२०१३ योजना " असा करण्यात आला आहे) घोषित केलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम (१९५८ चा अधिनियम क्रमांक ६०) (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम ९ च्या खंड (अ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढलेला शासन आदेश, महसूल व वन विभाग, क्र. मुद्रांक-२०१३/अनौ.सं.क्र. १९/प्र.क्र. २३५/म-१, दिनांक १६ ऑक्टोबर २०१७ (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त आदेश " असा करण्यात आला आहे ) याद्वारे, महाराष्ट्र शासनाने, उक्त साप्रोयो-२०१३ योजनेअंतर्गत मान्य युनिटांच्या किंवा प्रकल्पांच्या पात्र प्रवर्गाच्या संलेखांवर, उक्त अधिनियमासोबत जोडलेल्या अनुसूची-१ च्या विविध अनुच्छेदांन्वये आकारणीपात्र असलेले मुद्रांक शुल्क, लोकहितास्तव तसे करणे आवश्यक असल्याबद्दल त्याची खात्री पटल्यामुळे, उक्त आदेशामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शर्तींना अधीन राहून, माफ किंवा कमी केले आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने, शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, दिनांक १९ एप्रिल २०१८ याद्वारे दिनांक १ एप्रिल २०१३ च्या उक्त शासन निर्णयामध्ये सुधारणा करून, उक्त साप्रोयो-२०१३ योजनेच्या कालावधीमध्ये दिनांक ३० सप्टेंबर २०१८ पर्यंत अथवा नवीन धोरण अंमलात येईपर्यंत वाढ केलेली होती;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ९ च्या खंड (अ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासनाने शासन आदेश, महसूल व वन विभाग, क्रमांक मुद्रांक-२०१३/अनौ.सं.क्र. १९/प्र.क्र. २३५/म-१, दिनांक १८ जुलै २०१८ याद्वारे उक्त आदेशामध्ये सुधारणा करून, दिनांक ३० सप्टेंबर २०१८ पर्यंत अथवा नवीन धोरण अंमलात येईपर्यंत जे अगोदर असेल तो पर्यंत कालावधी वाढविला होता ;

आणि ज्याअर्थी, उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने हा कालावधी आणखी दिनांक ३१ मार्च २०१९ पर्यंत वाढविण्याची विनंती केलेली आहे ;

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम (१९५८ चा ६०) याच्या कलम ९ च्या खंड (अ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, उक्त आदेशामध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहे :—

उक्त आदेशामध्ये,—

(क) उद्देशिकेमध्ये, "दिनांक ३० सप्टेंबर २०१८ पर्यंत अथवा नवीन धोरण अंमलात येईपर्यंत जे अगोदर असेल तो पर्यंत", या मजकुराऐवजी, "दिनांक ३१ मार्च २०१९ पर्यंत किंवा महाराष्ट्र औद्योगिक धोरण, २०१९ खालील मुद्रांक शुल्क माफी किंवा सवलत देण्याकरिताचे आदेश **महाराष्ट्र शासन राजपत्रात** अधिसूचित तथा प्रसिध्द होईपर्यंत," हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) अटी व शर्तीमध्ये, शर्त क्र. (३) नंतर, पुढीलप्रमाणे नवीन शर्ती जादा दाखल करण्यात येतील :—

(४) उक्त साप्रोयो-२०१३ योजनेंतर्गत वर उल्लेख केलेल्या कालावधीमध्ये नोंदणी किंवा मान्य केलेले पात्र, नवीन किंवा विस्तार प्रकल्प किंवा उद्योग किंवा युनिट हे देखिल, त्यांच्या गुंतवणूक कालावधीमध्ये या आदेशान्वये मुद्रांक शुल्कामध्ये माफी किंवा सूट मिळण्याचा लाभ घेण्यासाठी, पात्र असतील.

(५) या आदेशान्वये मुद्रांक शुल्कात माफी किंवा सूट देण्यात आलेला तथा उक्त आदेशाला जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ (४) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दस्तऐवजात पक्षकार असलेला कोणताही पात्र प्रकल्प किंवा युनिट किंवा उद्योग, हा उक्त साप्रोयो-२०१३ योजनेचे किंवा उक्त धोरणाचे प्रयोजन किंवा उद्दिष्टे पूर्ण करण्यास असफल झाल्यास किंवा त्याने उक्त तसेच या आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही अटी व शर्तींचा भंग केल्यास, असा कोणताही पात्र प्रकल्प किंवा युनिट किंवा उद्योग, हा जणू काही सुरूवातीपासुन मुद्रांक शुल्कामध्ये माफी किंवा सूट देण्यात आली नव्हती असे समजून संपूर्ण मुद्रांक शुल्क व शास्ती, कोणतीही असल्यास, भरण्यास पात्र ठरेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**प्रितमकुमार व. जावळे,**
कार्यासन अधिकारी.

## REVENUE AND FOREST DEPARTMENT

Madam Kama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated the 14th August 2019

### Order

MAHARASHTRA STAMP ACT.

No. Mudrank-2013/UOR.19/CR-235/M-1 (Dhoran).—Whereas, the Government of Maharashtra has *vide* Government Resolution, Industries, Energy and Labour Department, No. PSI-2013/(CR-54)/ IND-8, dated the 1st April 2013 (hereinafter referred to as "the said Government Resolution"), declared the Package Scheme of Incentives-2013 (PSI-2013) (hereafter referred to as "the said PSI-2013 Scheme") ;

And Whereas, the Government of Maharashtra has *vide* Government Order, Revenue and Forests Department, No. Mudrank-2013/U.O.R.No.19/CR-235/M-1, dated the 16th October 2017 (hereinafter referred to as "the said Order"), issued in exercise of the powers conferred by clause *(a)* of section 9 of the Maharashtra Stamp Act (LX of 1958) (hereinafter referred to as "the said Act"), being satisfied that it is necessary to do so in the public interest, remitted or reduced the stamp duty chargeable under various Articles of the Schedule-I appended to the said Act, on the instruments of the eligible category of units or projects approved under the said PSI-2013 Scheme, subject to the conditions specified therein ;

And whereas, the Government of Maharashtra has *vide* Government Resolution, Industries, Energy and Labour Department, dated 19th April 2018, extended the period of the said PSI-2013 Scheme, till 30th September 2018 or till a new policy came into force, by amending the said Government Resolution, dated 1st April 2013 ;

And whereas, in exercise of the powers conferred by clause *(a)* of section 9 of the said Act, the Government of Maharashtra extended the period till 30th September 2018 or till a new policy came into force, whichever was earlier, by amending the said Order *vide* Government Order, Revenue and Forests Department, No. Mudrank-2013/U.O.R.No. 19/CR-235/M-1, dated the 18th July 2018 ;

And whereas, the Industries, Energy and Labour Department has requested further to extend the period upto 31st March 2019 ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by clause *(a)* of section 9 of the Maharashtra Stamp Act (LX of 1958), the Government of Maharashtra hereby amends the said Order, as follows, namely :—

In the said Order,—

*(a)* in the preamble, for the words, figures and letters, " till 30th September 2018 or till a new policy came into force, whichever was earlier", the words, figures and letters, " till 31st March 2019 or till an Order regarding stamp duty remission or reduction under the Maharashtra Industrial Policy, 2019 is published in the *Maharashtra Government Gazette*," shall be substituted ;

*(b)* in the conditions, after condition No. (3), the following new conditions shall be added, namely :—

(4) Eligible new or expansion project or industry or unit registered or approved under the said PSI-2013 Scheme during above mentioned period shall also be eligible for the benefit of stamp duty remission or reduction under this order during their investment period.

(5) Any eligible project or unit or industry which is party to the document as specified in column (4) of the Schedule appended to the said order, for which the remission or reduction in the stamp duty is granted under this order, and which fails to fulfil the purpose or objectives of the said PSI-2013 Scheme or the said Policy or commits breach of any of the conditions as specified in this order, shall be liable to pay the whole stamp duty and penalty if any, as if there was no remission or reduction in stamp duty from the beginning.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

PRITAMKUMAR V. JAWALE,
Desk Officer.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, DR. NAMDEO KONDAJI BHOSALE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : DIRECTOR, DR. NAMDEO KONDAJI BHOSALE.